## शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे - १

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ — फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई-मेल आय डी dydpune@gmail.com — वेबसाईट www.dydepune.com


जा.क्र.उमाशि-२/पुवि/संमा/२०१५-१६/
दिनांक : १४.८.२०१५

प्रति,

प्राचार्य,
माध्यमिक विद्यालय संलग्न उच्च माध्यमिक विद्यालये
वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालये
पुणे जिल्हा, पुणे

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पटपडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता.

संदर्भ :- १) शासन पत्र क्र.एचएससी-१३९०/२२१५४०/(९४३४)/उमाशि-१ दि.१४.१२.१९९०
२) शासन पत्र क्र.संकीर्ण १०९९/(२५५/९)माशि दि.०६.०९.१९९५
३) शासन पत्र क्र.एसएससी-२०११/(०१/११)/उमाशि-२ दि.२५.०६.२०११
४) शासन निर्णय क्र.एसएसएन १००७/(३६/०७)माशि-२ दि.०६.०२.२०१२
५) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रं. आका/डाटाबेस/१५/आस्था-ब(१२२)/२७४० दिनांक ११ ऑगस्ट २०१५

दिनांक ११/८/२०१५ रोजी झालेल्या व्ही. सी. मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील संदर्भीय पत्र क्रं. ५ मधील अ.क्रं. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयांची ऑनलाईन सॉफ्टवेअरद्वारे संच मान्यता करावयाची आहे. याअनुषंगाने शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे करीता दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे संच मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

त्यानुसार पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालये / उच्च माध्यमिक विद्यालयांची सन २०१४-१५ मधील संच मान्यता ऑनलाईन पध्दतीने http:/education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईट) संच मान्यतेबाबतची माहिती आपल्या तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने भरावयाची आहे. त्याबाबतच्या आवश्यक त्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. खाली नमूद केलेल्या कालावधीत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सर्व माहिती भरून घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. विहित मुदतीत माहिती भरली गेली नाही तर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सन २०१४-१५ ची संच मान्यता न होण्याची शक्यता आहे. त्यानंतर कोणतेही कारण ऐकून घेतले जाणार नाही.

२. वेबसाईटवर माहिती भरण्यासाठी आपण आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित खालील कागदपत्रे सोबत ठेऊन दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन डेटा भरावयाचा आहे.

- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील संच मान्यता प्रत.
- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये इ.११ वी व इ.१२ वी या वर्गात दिलेल्या प्रवेशानुसार शाखा व तुकडया निहाय विद्यार्थी संख्या (त्या विद्यार्थ्यांच्या नोंदी जनरल रजिस्टर मध्ये असाव्यात) जनरल रजिस्टरमध्ये नोंदी केलेल्या विद्यार्थ्यांचे इ.१० वी तील शाळा सोडल्याचे दाखले.

३. आपण सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने भरलेली माहिती तपासून बरोबर असल्याची खात्री करावी.

Scanned by CamScanner

४. विद्यार्थी संख्या, अनुदान प्रकार, मान्य व अनुदानित विषय तसेच मंजूर करून घेत असलेला कार्यभार मधील माहिती असत्य / खोटी निघाल्यास त्यास प्राचार्य हे वैयक्तिक जबाबदार राहतील व त्याबाबत नियमानुसार होणाऱ्या कारवाईस पात्र राहतील व त्या प्रमाणे प्राचार्यांनी हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

५. सदर शिबीराचे वेळापत्रक खालीलप्रमाणे : (या वेळापत्रकात बदल झाल्यास तशा सुचना विभागाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर देण्यात येतील.)

| दिनांक | वेळ | शिबिराचे ठिकाण | जिल्हा |
|---|---|---|---|
| १५.८.२०१५ ते १७.८.२०१५ | स.१० ते ५ | पुणे महानगरपालिकेचे राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, शिवदर्शन, शाहू कॉलेज रोड, सहकार नगर, पुणे - ४११ ००९ संपर्क - 9822260764 | पुणे |

६. सोलापूर व अहमदनगर जिल्हयातील उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयांकरीता स्वतंत्र वेळापत्रक www.dydepune.com प्रसिध्द केले जाईल.

७. मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी जिल्हावार फाईलचे रंग खालीलप्रमाणे : पुणे - हिरवा

८. शिबिरास येताना फाईलसोबत आणावयाची कागदपत्रे :-

१. वेबसाईटवर ऑनलाईन भरलेल्या माहितीची छापील प्रत (फायनलाईज करण्यापूर्वीचा ड्राफ्ट)

२. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये इ.११ वी व इ.१२ वी मधील प्रवेश नोंदविलेले परिपूर्ण जनरल रजिस्टर व शाळा सोडलेल्या दाखल्यांची फाईल

३. कार्यभार गणना तक्ता

४. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास दिलेल्या संच मान्यता व शिक्षक मान्यता पुरवणी मान्यतेसह आदेशांच्या झेरॉक्स प्रती.

MRaut
14.8.15
(मिनाक्षी राऊत)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ करीता

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव रवाना -

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
२/- यांना सुचित करण्यात येते की शिबिर कालावधीत सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक (उच्च माध्यमिक) यांना शिबिराच्या ठिकाणी उपस्थित राहणेबाबत आदेश द्यावेत.

प्रत :-

१. प्राचार्य, राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, शिवदर्शन, शाहू कॉलेज रोड, सहकार नगर, पुणे - ४११ ००९
२/- आपण शिबिर कालावधीत आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

Scanned by CamScanner